## सुवर्ण जयंती राजस्व अभियान जिल्हाधिकारी कार्यालय,गोंदिया
## प्रसिध्दी वाहन ( फ्लोट/डिसप्ले) व कलापथक या करीता निवीदा सादर करणे

जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया तर्फे महाराष्ट्र शासनाचा महत्वकांक्षी कार्यक्रम सुवर्ण जयंती राजस्व अभियान या योजनेची माहिती गोंदिया जिल्हयात गांव पातळीवर प्रसिध्दी करण्याकरीता एक प्रसिध्दी वाहन तसेच या योजनेची माहिती नाटय रूपात सादर करण्याकरीता एक कलापथक संचाची आवश्यकता आहे.

**वाहन व कलापथक बाबत आवश्यक असणाऱ्या बाबी खालीलप्रमाणे आहेत.**

१. वाहन कलापथक संच या करीता एकत्रित निविदा सादर कराव्या लागेल.
२. कोऱ्या निवीदा फार्म रू.१,०००/- नगदी भरून कार्यालयातून कार्यालयीन वेळेत दिनांक १८ /३/२०१५ ते दिनांक २४/३/२०१५पर्यंत प्राप्त करून घ्याव्यात.
३. निविदा भरण्याची अंतिम तारीख २५/३/२०१५ दुपारी १२.०० वाजे पर्यंत आहे.
४. निविदा उघडण्याची दिनांक व वेळ २५/३/२०१५ दुपारी ३.०० वाजता व निविदा नियमानुसार योग्य असल्यास त्याच दिवशी मंजूर करण्यात येतील.व कार्यक्रम दिनांक २६/३/२०१५ पासून दिनांक ३१/३/२०१५ पर्यंत सादरीकरण करावे लागेल.
५. निविदे सोबत ५,०००/- EMD जमा करावी लागेल.
६. निविदा उघडतेवेळेस कार्यक्रमाचे सादरीकरणाचे प्रात्येक्षिक करून दाखवावे लागेल.
७. प्रसिध्दी वाहन व कलापथक संच

| | | |
|---|---|---|
| प्रसिध्दी वाहन | वाहन मॉडलः स्वराज माजदा किंवा त्या आकराचे वाहन ज्यावर स्टेज क्षेत्रपळ १०० ते १२५ स्के. फुट राहील त्यावर फ्लेक्स, बॅनर लावून वाहन सजविणे माईक सिस्टीम जनरेटर,लाईट,स्टेज मॅटीन तसेच त्यात डिझेल, ड्राव्हर व इतर संपूर्ण खर्च समाविष्ट राहील. | जिल्हाधिकारी कार्यालयाने ठरविलेल्या दिनांकापासून कार्यक्रमाची सुरूवात करावी लागेल.एकूण 42 कार्यक्रमासाठी निविदा. |
| कलापथक संच | कला पथक संच मध्ये एकूण ७ व्यक्ती राहतील त्यात एक ढोलकी व एक हार्मोनियम वादक राहील. सर्व कलाकार विशिष्ट ड्रेस मध्ये कार्यक्रम सादर करतील. | |

अटी व शर्ती:-

१. वाहनासह कलापथकाच्या कार्यक्रमाकरीता वर नमुद वाहन सजावट, व कलापथक संचासह नियोजित स्थळी फिरविणे या करीता प्रति कार्यक्रम या प्रमाणे दर सादर करावे. वाहनातील कर्मचारी तसेच कलापथकातील सर्व कलाकार यांच्या जेवण्याचा, राहण्याचा संपूर्ण खर्च व व्यवस्था त्यात समाविष्ठ राहिल.
२. या पूर्वी कार्यक्रम सादर केल्याचे प्रमाणपत्र व छायाचित्रे निवीदे सोबत जोडावे.
३. प्रसिध्दी कार्यक्रम ४२ गांवामध्ये सादर करण्यात येईल. व त्यात बदल करण्याचा अधिकार मा.जिल्हाधिकारी यांना राहिल.
४. गोंदिया जिल्हयातील प्रत्येक तलाठी सझामध्ये कार्यक्रम करावा लागेल.प्रति दिवशी सरासरी ७ वेळा वेगवेगळया ठिकाणी कलापथक कार्यक्रम करावे लागेल.
५. वाहना वरिल फ्लेक्स , बॅनर या कार्यालयाने पुरविलेल्या माहितीच्या आधारे निविदा धारकांची निविदा मंजर झाल्यानंतर करणे बंधनकारक राहील.
६. वाहनास अपघात झाल्यास त्या संबधी होणारी कायदेशिर कार्यवाही व आर्थिक नुकसान याची सर्व जबाबदारी निविदाधारकांची राहील. त्या करीता हे कार्यालय कोणत्याही करणा करीता जबाबदार राहणार नाही.
७. वाहन नादुरस्त झाल्यास किंवा इतर कुठल्याही कारणाने निवीदा धारकांचे चुकीचे नियोजनामुळे कार्यक्रम न झाल्यास कार्यक्रमाप्रमाणे मंजूर रक्कमेच्या दुपटीने दंड आकारण्यात येईल. व दंडाची रक्कम निविदा धारकाचे देय रक्कमेतून कपात करण्यात येईल.
८. कलापथक संचाला या विभागाकडून पुरविण्यात आलेली अभियान संदर्भातील माहिती नाटय रूपात सादर करून प्रसिध्दी करावी लागेल.
९. कार्यक्रम सादर केल्याबाबतचे प्रमाणपत्र संबधित मंडळाधिकारी/तलाठी, पोलिस पाटील,सरपंच याचे कडून प्राप्त करून या कार्यालयात सादर करावे लागेल.
१०. कलापथकातील कलांकारांना ड्रेस मध्ये कार्यक्रम सादर करावा लागेल.

जिल्हाधिकारी,गोंदिया

## निविदा फॉर्म
## सुवर्ण जयंती राजस्व अभियान जिल्हाधिकारी कार्यालय,गोंदिया
## वाहन व कलापथक या करीता निवदा फॉर्म

निविदा किंमत रूपये १०००/-
फॉर्म क्रमांक ---------
पावती क्रमांक --------
दिनांक ------------

प्रसिध्दी वाहन (फ्लेट/डिसप्ले) व कलापथक या करीता एकत्रित दर खालील प्रमाणे सादर करीत आहे.

१. माझे वाहन मॉडेल ---------- क्रमांक ----------- राहील. त्यासोबत आवश्यक क्षमतेचे जनरेटर राहिल.
२. वाहन मॉडलः स्वराज माजदा किंवा त्या आकाराचे वाहन ज्यावर स्टेज क्षेत्रफळ १०० ते १२५ स्के.फुट राहील त्यावर (फ्लेक्स, बॅनर लावून वाहन सर्जाविणे माईक सिस्टिम जनरेटर, लाईट,स्टेज, मॅटीन तसेच त्यात डिझेल,ड्राव्हर व इतर संपूर्ण खर्च समाविष्ट राहिल.)
३. निविदा सोबत वाहना संबंधित संपूर्ण दस्ताऐवज सोबत जोडण्यात आलेला आहे.
४. वाहनाला लावण्यात येणारे फ्लेक्स बॅनर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मंजूर करून घेण्यात येतील. व ते सजवून चित्ररथ तयार करण्याची जबाबदारी माझी राहील.
५. वाहनाला अपघात झाल्यास त्याची नुकसान भरपाई व कायदेशिर बाबी करीता मी स्वतः जबाबदार राहीन. आपल्या कार्यालयाची जबाबदारी राहणार नाही.
६. कलापथक संच मध्ये एकूण ७ व्यक्ती राहतील त्यात एक ढोलकी, एक हार्मोनियम वादक राहील. सर्व कलाकार विशिष्ट ड्रेस मध्ये कार्यक्रम सादर करतील.
७. निविदा धारकाने यापूर्वी सादर केलेल्या प्रमाणपत्र व छायाचित्रे जोडली आहे.
८. प्रसिध्दी वाहन व कलापथक संचासह दर दिवशी ७ कार्यक्रम सादर करण्यात येईल.
९. कलापथक संच प्रत्येक सादरी करणाचे वेळेस निहित करून दिलेल्या ड्रेस मध्ये कार्यक्रम सादर करतील.
१०. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नेमून दिलेल्या गावात व नेमून दिलेल्या वेळेत वाहनाव्दारे प्रसिध्दी तसेच कलापथकाचा निहित केलेला कार्यक्रम दाखविण्याची माझी जबाबदारी राहील.
११. संबधित गांवात कार्यक्रमाचे सादरीकरण केल्यानंतर तेथील तेथील उपस्थित नागरीक, पोलिस पाटील, तलाठी, सरपंच, मंडळाधिकारी इत्यादींचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यांत येईल.
१२. सादर केलेल्या कार्यक्रमाचे फोटो व जाहिरातील संबधित कार्यक्रम सादर केल्याचे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी माझी राहील.
१३. जिल्हाधिकरी कार्यालयाकडून कलापथकाव्दारे करण्यात येणारा कार्यक्रम प्रत्येक ठिकाणी दाखविण्यात येईल. व त्या मध्ये कुठलाही फेरबदल मा.जिल्हाधिकारी यांचे परवानगी शिवाय केला जाणार नाही.
१४. वाहनासह कलापथकाच्या कार्यक्रमाकरीता वर नमुद वाहन सजावट व कलापथक संचासह नियोजित स्थळी फिरविण्याची जबाबदारी माझी राहील. वाहनातील कर्मचारी तसेच कलापथकीतल सर्व कलाकार यांच्या जेवण्याचा, राहण्याचा संपूर्ण खर्च व व्यवस्था या खालील नमुद केलेल्या एकत्रित दरात समाविष्ठ आहे.
१५. वाहन ना दुरूस्त झाल्यास किंवा इतर कुठल्याही माझ्या चुकीच्या नियोजनामुळे नियोजित स्थळी वाहन व कलापथक संचा सोबत पोहचू शकलो नाही तर प्रति कार्यक्रमाच्या किंवा दिवसाला येणाऱ्या रक्कमेच्या दुप्पट रक्कम माझ्या देयकातून कपात केल्यास माझी हरकत नाही.
१६. नैसर्गिक आपत्ती किंवा इतर अपिहार्य कारणास्तव कलापथकाचा कार्यक्रम दाखवता आला नाही. तर त्या दिवसाची रक्कम प्राप्त करण्यास मी पात्र राहणार नाही. व त्या नियोजित ठिकाण चा कार्यक्रम इतर दिवशी मा. जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगीने सादर करणे शक्य झाल्यास दाखविण्यात येईल.
१७. जिल्हाधिकारी यांना सदर प्रसिध्दी व कलापथकाचा कार्यक्रम कोणत्याही दिवशी बंद करण्याचे अधिकार राहतील. व प्रत्येक्षात जितके कार्यक्रम प्रदर्शित झालेत. तेवढयाच कार्यक्रमाची रक्कम मी प्राप्त करण्यास पात्र राहिल व त्यावर माझा कुठलाही आक्षेप राहणार नाही.
१८. निविदा मंजूर झाल्यावर तसेच कार्यक्रमाचे सादरीकरण मंजूर झाल्यावर त्यामध्ये काही बदल करण्याचे निर्देश प्राप्त झाल्यास त्या निर्देशानुसार फॅलेक्स , बॅनर मध्ये किंवा कलापथकाच्या सादरी करणामध्ये बदल करण्यांत येईल.
१९. कुठलीही निविदा किंवा संपूर्ण निविदा रद्द करण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवल आहेत.
२०. निविदा मंजूर झाल्यानंतर ३ टक्के रक्कम सुरक्षा ठेव म्हणून जिल्हाधिकरी कार्यालयात जमा करावी लागेल.

मला वरिल सर्व अटी व शर्ती मान्य असून मी माझ्या प्रसिध्दी वाहनासह कलापथक संचाच्या कार्यक्रम सादरीकरा करीता प्रति कार्यक्रम रु. ----------------- (अक्षरी रू. ----------------------- ) दर सादर करीत आहे.

(निविदा भरणाऱ्याचे नाव पत्ता व सही)